# अध्याय बारावा

१.	असं मिसळलं कोणी तुज भक्त उपासिती
कोणी अक्षर अव्यक्त योगी ते थोर कोणते

त्या थोर विनयशील परमपवित्र भक्तांची आपल्या प्रेमास्पदाशी, आपल्या प्राणाच्या प्राणाशी, आपल्या जीवाच्याही पलीकडच्या प्रियतेच्या प्रियतेशी - त्या प्रभूशी - अगदी प्रतिक्षणी मिसळून जाण्याच्या रीतीची कल्पना तरी करता येईल काय? तेथे कल्पना मावळते! बुद्धी चालत नाही! शब्द पांगळे होतात! सगळी शक्ती अगदी नि:स्पंद बनते!

ती प्रीतीची रीती, ती नीतीची परमावधी, ती संस्कृतीची परमसंस्कृती, ती मांगल्याच्या ममत्वाची मोहिनी, ती सतत समुद्राशी आपले आपलेपण लोपवून, मिसळून जाण्याची परम पावन गंगेची ललितलावण्यलीला! कोमल आणि मनोहर, विविध आणि सुंदर, प्रफुल्ल आणि गंधगहन, मधुर आणि मोहक, अशा पुष्पांच्या माळेच्या अंतरंगात शिरून सतत गुप्त राहणारी ती सूत्रमय सरस सरणी! बृहस्पतितुल्य गुरूलाही गौरवास्पद अशी ती अनेक बुद्धीमान शिष्यशेखरांच्या शालीनतेशी सतत स्पर्धा करणारी, अंतरंगाच्या अंतरंगात सतत रमून राहणारी अखंड अंतेवासी जीवन साधना! महामहिम मातृमूर्तिच्या ममतेलाही मागे टाकणाऱ्या, प्रभूच्या महामोहाला मारणाऱ्या ममतामय साम्यरूपाशी सतत समरसलेली ती आत्मसमर्पणाची भावभंगिमा!

तिला पाहून तो भावाच्या भुकेने भुललेला प्रभु सकलसौंदर्यरूप लक्षणालक्ष्मीसह, अखंडविद्यावैभवविलासिनीसरस्वतीसह, सर्वसामर्थ्यप्रसन्ना

शक्तीसह भक्तांशी का समरसून जाणार नाही? भक्तांच्या हृदयसर्वस्वमर्पणात प्रभूचे शक्तित्रयसर्वस्वसमर्पण ही कल्पनाच किती उदात्त, पावन आणि परमरमणीय आहे. भक्तांच्या परमप्रिय प्रभूने लक्ष्मी, सरस्वती आणि शक्ती तिहींना भक्तांच्या परमरमणीय भक्तीपुढे नमनीय बनविल्या आहेत.

त्यामुळे भक्तांच्या उपासनेला कधीही काहीही कमी पडू नये ही त्याची युक्ती अगदी बेमालूम साधत आलेली आहे. त्यामुळे भक्त वरून वरून कितीही असमर्थ कितीही दरिद्री दिसले तरी आतून त्यांचे उपासनावैभव राजराजेश्वराच्या वैभवालाही तुच्छ ठरविणारे ठरावे, त्यांच्या एखाद्या पुष्पसमर्पणाने महापूजेचीही महापूजा निर्माण व्हावी, त्यांच्या एखाद्या पुष्पसमर्पणाने अमृतसिंधूच्या अमृतसिंधूची मोहमय मार्दवमाधुरी दृश्यमान व्हावी, त्यांच्या जागृतीत, त्यांच्या निद्रेत, त्यांच्या स्वप्नात, अथवा जागृत्स्वप्नसुषुप्तीच्या पलीकडे आणि जागृत्स्वप्नसुषुप्तीला व्यापून असणाऱ्या त्यांच्या तुरीय अवस्थेत त्या परात्पर प्रभूच्या उपासनेच्या, ध्यानपूजेच्या, तपस्येच्या, विवेकवैराग्याच्या रागरागिण्याच आलापित व्हाव्यात यात मुळीच आश्चर्य नाही. भक्तांचे चालणे, बसणे, उठणे, त्यांची राहणी, त्यांचा निवास, त्यांचे प्रभुकृपेच्या प्रसादकथांचे सुखसंवाद, उपासनासूत्रानेच प्रस्फुटित व्हावेत हीही अतिशय स्वाभाविक गोष्ट मानावी लागेल. त्यांच्या उपासनेची गूढता, त्यांच्या उपासनेची गाढता, त्यांच्या उपासनेचा आकार, त्यांच्या उपासनेचा प्रकार, त्यांच्या उपासनेची खोली, त्यांच्या उपासनेची व्यापकता, त्यांच्या उपासनेची भव्यता, त्यांच्या उपासनेची दिव्यता, त्यांच्या उपासनेची सात्विकता, त्यांच्या उपासनेची तात्विकता त्यांच्या उपासनेची सगुणता, त्यांच्या उपासनेची अनंत गुणमयता! त्यांच्या उपासनेचे वर्णन कोण करू शकेल? फार फार तर इतकेच म्हणता येईल की ती केवळ

अतुलनीयच होय.

प्रश्न असा की उपासनेची रीती, उपासनेची सरणी, त्या कृपानिधान प्रभूशी सर्वथैव समरसून जरी अतिशय मनोहर रूपाने मांडली गेली तरी अनंतरूप प्रभूची तीच एक भक्तीभावभूमिका असू शकेल काय? झुळझुळ वाहणाऱ्या नदीला दोन तट चकचकणाऱ्या नाण्याच्या दोन बाजू, नेहमी आधार देणाऱ्या काठीची दोन टोके, निरंतर परोपकारी वृक्षांचे बीज आणि फळ असे द्विविध रूप, सर्व प्राण्यांचे जीवन असे पाणी, त्याची बर्फ आणि वाफ अशी द्विविध रूपे, परमरमणीय गायनकलेत आरोह आणि अवरोहाचे दोन प्रकार, अनाद्यानंत कालक्रमात दिवसरात्रीची द्विविध रचना, अंत:करणाशयात बोध आणि भावनांचे युग्म, वस्त्रामध्ये ताणा आणि वाणा, आकाशात सूर्य आणि चंद्र, अशी जर दोन प्रकारांच्या प्रत्ययाची परंपरा आहे तर भक्तिप्रकारातही ती केवळ सगुण कशी असेल? तिची अन्य बाजू दुर्लक्षून कसे चालेल? अहंममतेचा त्याग करण्यासाठी निर्माण झालेल्या यज्ञप्रक्रियेत अतिशय पवित्र अशा स्वाहास्वधाव्यतिरिक्त कसे चालेल?

म्हणूनच ज्याप्रमाणे गुरूला अतिशय नम्रतेने, मातेला अतिशय लडिवाळपणाने, थोर पुरुषाला आपल्या गुणगौरवाने, मित्राला आपल्या दृढ मैत्रीने, अगदी प्रसन्न करून विचारावे त्याप्रमाणे येथे विचारले गेले - हे प्रभो तुझ्या भक्तीचे ते दुसरे दालन, ते दुसरे रहस्य, तुझ्या भक्तीचे ते दुसरे गूढ, तुझ्या भक्तीची ती लपलेली दुसरी बाजू. ती दृष्टीआडची सृष्टी, तुझ्या कृपाप्रसादाने आम्हाला दिसेल असे करशील ना? ते बघण्याचे भाग्य आम्हाला प्राप्त होईल का? तो सुयोग आम्हाला लाभेल ना? तुझ्या हृदयकाशातल्या सगुण भक्तिपौर्णिमेच्या प्रकाशात सोहळा तुझ्या कृपेने आम्ही पाहू शकलो. आता तुझ्या निर्घृण भक्तीच्या

अमावास्येच्या गाढगूढतेची गौरवगरिमा दिसेल म्हणून आम्ही तुझ्या कृपेची वाट पहात आहोत!

आम्हाला ती दुसरी दुनिया पाहून हे विचारावयाचे आहे की, हा जो तुझा भक्तीचा दुसरा योग आहे तो मोठा की पहिला मोठा? प्रथम म्हणून तो अद्वितीय की, द्वितीय असून तो अद्वितीय? तुझ्या भक्तिग्रंथाची ती थोर रहस्यमय अक्षरे वाचण्याचा आम्ही प्रयत्न करू. त्यातला अव्यक्तबोध आम्हाला व्यक्त होईल असे कर.

आम्हाला हेही विचारावयाचे आहे की, पहिल्या प्रकारच्या भक्तांना तुझ्या सामीप्ययोगाच्या जाणिवेचा अधिक लाभ की दुसऱ्या प्रकारच्या भक्तांना तुझे योगरूपरहस्य अधिक कळू शकते? हे आम्ही विचारतो त्यात आम्हाला काही आमच्या आवडीने निवड करावयाची आहे असे नाही. आम्ही तर तुझ्या थोर भक्तांच्या चरणरजाच्या चरणरजाचीही बरोबरी करू शकत नाही. असे असून तुझ्या कृपेवर विसंबून आम्ही हे विचारीत आहोत. त्यावर भगवान उत्तर देतात -

२. रोवूनि मन माझ्यांत भजती नित्य जोडिले
श्रद्धेने भारले माझ्या ते योगी थोर मानितो

चित्ताची, मनाची, अंत:करणाची, चंचलता ही बहुतेक सर्वांच्या अनुभवाची गोष्ट आहे. गाढ निद्रेत चित्त नि:स्पंद असते. पण तेथेही ते स्वप्नसृष्टी निर्माण करून चांचल्याच्या चालीच्या चवीने चलच्चित्रचरित्रे निर्माण करते आणि पुन्हा समाधान पावत नाही ते नाहीच. पण गाढ निद्रेत चित्त नि:स्पंद असते ना? असा प्रश्न पुढे येतो. ते नि:स्पंद दिसते पण तसे ते नसते. शत्रूला चकविण्यासाठी माघार घेणाऱ्याची माघार ही माघार नसते. मातीत बीज गुप्त होते ते पुढच्या प्रचंड वृक्षाच्या प्रगटीकरणासाठी तीव्र उन्हाळ्याचा उकाडा पुढच्या पावसाच्या

संततधारेसाठी. वादळापूर्वीची शांतीही भ्रांती असून तिने बेसावध करणाऱ्याला पूर्ण जमीनदोस्त करण्याची ती न कळणारी सूचनाच असते. त्याप्रमाणे चित्ताचे गाढ निर्देत भान हरपणे भानावर आल्यावरच्या सतत भ्रमणशीलतेचा आक्रमक पवित्राच असतो. अशा त्या चारी बाजूला चौफेर पसरणाऱ्या चंचल चित्ताच्या चांचल्याची विचित्र अवस्था काही काळ क्वचित कोठे कोणाच्या मधुर संगीताच्या लकेरीत, क्वचित गणिताच्या गहन गाढ चिंतनात, क्वचित वैज्ञानिकांच्या प्रयोगविषयात स्थिर झालेले दिसते. पण तेथे ते शेवटी थकून जाते आणि लगेच पुन्हा आपल्या अस्थिर पूर्वस्वभावाचे वेगाने अनुसरण करते. मन म्हटले म्हणजे ते मनन करणारे असले पाहिजे. चित्त म्हटले तर त्याने चिंतन करावयास हवे. अंत:करण म्हटले तर त्याने अंतर्मुख व्हावयास पाहिजे. पण ते अंतर्मुख न होता, चिंतन न करता, मनन न करता, भ्रमण मात्र सतत करीत असते. याचे कारण जगातल्या कोणत्याही विषयात त्याचे समाधान होऊ शकत नाही. समाधानाची जागा जगात प्रभूशिवाय कोठेही नाही. म्हणून खरे थोर भक्त मनाला, चित्ताला, अंत:करणाला, प्रभुचरणी समर्पित करून, तेथेच त्याला रोवून ठेवतात. तेथेच त्याच्या निराधारितेला आधार मिळतो. तेथेच प्रभूच्या पादपद्मीच,त्याला समाधान प्राप्त होऊ शकते. इतकेच काय, प्रभूच्या चरणापाशीच त्याला पोषण मिळते. मातीत रोवलेल्या रोपाला मातीतून पोषण मिळते तसे प्रभुचरणरेणूतून चित्ताला अद्‌भुत् पोषण मिळते. कारण थोर भक्त परमेश्वराच्या परम श्रद्धेने भरलेले असतात इतकेच काय पण ते परमेश्वराच्या परम श्रद्धेने भारलेले असतात. आधीच सोने त्यात सुगंध अशी त्यांची अवस्था असते. परमेश्वराविषयी परम श्रद्धा हा त्यांच्या प्राणाचा प्राण, जीवाचा जीव असतो. अमृताच्या मृत्तिकेने तयार केलेल्या अमृताचा कुंभ अमृताने भरून अमृतसमुद्रात ठेवलेला असावा तसे भक्त त्या परम श्रद्धेनेच बनलेले. त्या परम

श्रद्धेनेच अंतर्बाह्य भरून गेलेले असतात. मातेच्या मांडीवर पहुडलेल्या तान्हुल्याची जशी मातेच्या ठिकाणी पूर्ण परम श्रद्धा असते, त्याहूनही मातेची माता जो तो जगत्प्रभु त्याच्यावर भक्ताची परम श्रद्धा असते.

त्या अपार श्रद्धेमुळे ते थोर भक्त सदोदित त्या परात्पर प्रभूच्या अंतरंगाशी अगदी मिळून त्याच्या भावभजनात सतत रंगून गेलेले असतात.

अशा त्या थोर भक्तांच्या महिम्याला कोठेही सीमा नाही. पौर्णिमाचंद्राने समुद्राला येणाऱ्या भरतीच्या लहरींची, वसंत ऋतूने जिकडे तिकडे वृक्षवल्लरींना येणाऱ्या कोमल पल्लवपुष्पांची किंवा अमावस्येच्या रात्री निळ्या आकाशात चकचकणाऱ्या तारकांची गणती कशी करणार? तेथे गणना सगळी सरून जाते.

मग साक्षात प्रभूच पुढे येऊन त्या थोर भक्तांच्या यशोगानात रंगून, सगुणाचे गुणगान करून, आपल्या अगदी आवडीची निवड, आपल्या मनात मुरलेली मान्यता मोकळेपणाने सांगतात.

३. परी अचित्य अव्यक्त सर्वव्यापी खूणेविण
नित्य निश्चल निर्लिप्त जे अक्षर उपासिती

अशी जरी भगवंतांनी आपली आवड मोकळेपणाने मांडली, तरी ती आवड एकांगी नाही. वरपांगी तसे भासले तरी तो भासच. निर्गुण उपासकांची दुसरी बाजू भगवान् विस्ताराने मांडतात. आठ प्रकारचे ते वर्णनही अवर्णनीय आहे. सगुण भक्त तान्ह्या मुलाला जशी आई अगदी सतत आपल्या जवळ ठेवते, तसे सगुण भक्त भगवंतांच्या जरी अगदी जवळ सतत जोडलेले असले तरी निर्गुण उपासकही आईला जसा मोठा मुलगाही प्रिय असतो त्याप्रमाणे प्रिय असतात. निर्गुण उपासकांची स्थिती सगुण उपासकांच्या पेक्षा अगदी उलट असते. आईचा तान्हा मुलगा आईच्या अगदी छातीशी धरलेला असतो. त्याला पाळण्यात ठेवला

तरी तिला त्याची सतत चिंता असते. मोठ्या मुलाची तशी चिंता नसते. म्हणून तो अचिंत्य म्हणावयाचा. आईला तो अगदी तान्ह्या मुलाप्रमाणे सतत व्यक्त नाही. तो सगळीकडे जाणेयेणे करणारा सर्वव्यापी आहे. लहान मुलाला नेहमी आई जवळ असावी लागते. मांडीवर निजताना सुद्धा त्यांच्या डोक्यावर आई अलगत हात ठेवते. ती आईच्या वरदहस्ताची खूण असल्याशिवाय बाळाला झोप येत नाही. तशा कोणत्याच खुणेची मोठ्या मुलाला जरूर नसते. मोठ्या मुलाची नित्य काळजी करावी लागत नाही. मोठा मुलगा आई दिसत नाही म्हणून रडणार नाही. तो निश्चल राहील. मोठ्या मुलाला लहान मुलाप्रमाणे तेलाने माखून न्हाऊ घालावे लागत नाही. तो या गोष्टीपासून निर्लिप्त असतो. लहान मुलाला बोलताही येत नाही. पण मोठ्या मुलाची अक्षर ओळख होऊन तो आवडी आवडीने गोड गोड गोष्टीत गढून जाऊ शकतो. हा लहान बाळ आणि मोठ्या मुलात फरक आहे.

पण हा फरक जितका सरळ आणि सोपा दिसतो तितकी निर्गुण उपासना सहज आणि सरळ नाही. निर्गुण उपासनेत मनुष्याला नेहमी जशी हवा हवी असते तसे चित्ताला नित्य चिंतन हवे असते. ते नाही तेथे अचिंत्य हीच उपासना आहे. प्रत्येक व्यक्ती ही नेहमी व्यक्तातच वावरत असते. पण या निर्गुण उपासनेत व्यक्ताचा पूर्ण अभाव आहे. म्हणूनच तिला अव्यक्त म्हटले आहे. तसेच प्रत्येक मनुष्याचा काही ना काही व्याप असतोच. पण या निर्गुण उपासनेत सर्वच व्याप्त व्हावयाचे म्हणूनच ती सर्वव्यापी. पण ती कशी काय हे विचारण्याची सोय नाही. या जगात प्रत्येक वस्तूला नाव असते. ती त्या वस्तूची खूण असते. अशा खुणांनी म्हणजे भाषेने मनुष्याचा व्यवहार चालतो. पण येथे सर्व खुणा वर्ज्य. येथे भाषा खुंटून जाते. ही निर्गुण उपासना खुणेविण म्हटली गेली आहे. या जगात

सतत परिवर्तन होत राहते. रात्र आणि दिवस हे कालपरिवर्तन, इकडून तिकडे जाणे हे स्थलपरिवर्तन, दिवसेंदिवस वृद्धी हे देहपरिवर्तन. अशी अनेक परिवर्तने मिळून जीवन चालत असते. येथे परिवर्तनाचे नाव नाही. अशी ही परिवर्तनशून्य जगावेगळी नित्य शब्दाने सूचित होणारी निर्गुण उपासना आहे. जडचेतन सर्ववस्तूंना चलनशीलता असते. चेतन वस्तूंची चलनशीलता दृग्गोचर होत असतेच पण जड वस्तूंच्या बाबतीत तसे होत नाही. असा प्रश्न उपस्थित होतो. पण विज्ञानाचा सिद्धात आहे की, प्रत्येक वस्तूला गती आहे. येथे गतिशून्य स्थिती आहे. येथे निश्चल हे निर्गुण उपासनेचे लक्षण स्पष्टपणे मांडले आहे. म्हणजे ही जगाच्या पलीकडची स्थिती आहे. हवा, पाणी, प्रकाश, आकाश, मृत्तिका, वस्त्र, पात्र, अन्न, निद्रा, कामकाज या सर्व संबंधाने मनुष्यजीवन चाललेले असते. प्राणिमात्राचे जीवन चाललेले असते. ते येथे उपासनेत पूर्ण वर्ज्य आहे. येथे त्याची कल्पना निर्लिप्त या संक्षिप्त शब्दाने दिली आहे. हवेशिवाय, पाण्याशिवाय, आकाशाशिवाय, प्रकाशाशिवाय, वस्त्राशिवाय, पात्राशिवाय, अन्नाशिवाय, कोणत्याही कामकाजाशिवाय, निद्रेशिवाय कसे चालेल? भुकेनेच भूक भागवावी. तहानेनेच तहान प्यावी. निद्रेनेच निद्रा घ्यावी! असे अलंकारिकतेने म्हटले तरी ती गोष्ट शक्य कशी व्हावी? या उपासनेलाच अक्षर नाव आहे. सगुण उपासनेत कधी पाटलपुष्पपूजेने देव पूजावा, तर कधी मोगऱ्याच्या मुक्तमाळेने देव सजवावा, कधी कमळे वहावीत तर कधी पारिजातपुष्पांनी पूजा करावी. अशा विविध प्रकारांनी सगुण उपासना होत असते. पण येथे असल्या प्रकारचे नाव ही नाही. मग त्याचे अक्षर कोठे? अक्षर हे या उपासनेचे नाव ही विनावी अनामीच समजले पाहिजे. हिला उपासना तरी कसे म्हणावे? उपासना जवळ बसून होते. येथे जवळ दूर काहीच नाही. सर्व अभाव. सर्व शून्य. या शून्याचा, या अभावाचा कोठेही अंत नाही. अभाव हा अनंत असू शकत नाही. म्हणून ही निर्गुण उपासना

शून्यापलीकडचे शून्य, अनंताचे अनंत अशी अकल्पनीय उपासना ठरते. ही उपासना अशी अनंत असल्यामुळे उपासक ही महाकठिण उपासना कशी करणार? या शंकेला अवसर न देता भगवान् मार्गदर्शन करतात -

४. रोधिती इंद्रिये पूर्ण सर्वत्र सम जाणुनी
माझ्याकडे चि ते येती ज्ञानी विश्वहिची रत

ही निर्गुण उपासना उपासकाचा अंत करणारी, जीवाचे जीवन ही धोक्यात टाकणारी कठिणतेची ही कठोर कठीणता दिसते आणि तशी ती असते हे ही खरे. तरी येथे साधकाच्या साधनेची सूक्ष्म सोय ही नाही असे नाही. या सोयीची समजूत समजून घेण्यासाठी जगातल्या जीवन परिस्थितीचे अवलोकन अवश्य आहे. पहा, चराचर सर्व जगाच्या पोषणाच्या प्रेरणेची महनीय मूर्ती जो सूर्य तो रात्रीचा अंधकार आपल्या सोनेरी किरणांनी दूर करतो हे खरे तरी तेथे सौम्यतेच्या सौमनस्यतेचे सुख आहे काय? चकोराचे चित्त चोरणारी चंद्राची कोर जरी सुंदर दिसली तरी तिच्या ठिकाणच्या वक्रतेच्या विकाराचा विसर कसा पडणार? रात्री हजारो नेत्रांनी तारकामिषाने सर्वाकडे प्रेमळपणे पाहणाऱ्या आकाशाच्या विशालतेची महनीय रमणीयता रम्यतेची रम्यता जरी भासमान होते, तरी भयाण अंधकाराच्या दूरीकरण्याच्या दृष्टीचे दर्शन तेथे प्राप्त कसे होणार? असंख्य रत्नांना आपल्या पोटात दडवून वसंत ऋतूत फुललेल्या फुलांच्याप्रमाणे फेसाने फेसाळून पाण्यामधून लाटा आणि लाटामधून पाणी असे नित्यनूतन नृत्य निर्मून जरी समुद्राचे सागरसंगीत सतत रंगत असले तरी समुद्राच्या ठिकाणी असलेल्या खारेपणाची उणीव दूर कशी होणार? प्रयागतीर्थातला गंगायमुनासरस्वतीचा त्रिवेणीसंगम परम पवित्र म्हणून तेथे स्नानाचा सोहळा जरी हवाहवासा वाटला तरी तेथल्या पाण्यात जीवनाची हानी होण्याची शक्यता विसरता येईल काय? काय जागृतीचा

बुद्धीबोध कितीही रमणीय, कमनीय आणि खरोखर नमनीय असला तरी त्याच्या ठिकाणची  विश्रामाची उणीव नष्ट होऊ शकेल? चराचर जीवजगताला शांती देणारी जी निद्रादेवी तिच्या उपासनेशिवाय कोणाचेही चालत नाही ही अनुभवाची गोष्ट खरी, पण तिच्या ठिकाणच्या अज्ञानाची उणीव कशी दडेल? साक्षात् विष्णूचे चरण चुरणाऱ्या लक्ष्मीदेवीच्या विपुल वैभवाला कोठेच कमतरता नसली तरी सरस्वतीच्या सरहस्य सरस विद्याविहार-विलासाची विशेषता तेथे कशी यावी? शक्तीदेवीच्या शक्तीचे माप कुणालाही कधीही कोठेही लागणे अशक्यप्राय असले तरी सेवादेवीची सर तिला कशी येईल?

अशाप्रकारे महान थोरांच्याही थोरांच्या ठिकाणी काही ना काही उणीव काढणे शक्य होते तर सामान्य सृष्टीत केवढी अपूर्णता भासेल? ती आपल्या सर्वभूतहितात रमलेल्या दृष्टीने पूर्ण करून, सर्वत्र वैषम्याचा दोष निवारून, अंत:करणात समतेचे साम्राज्य स्थापून, निर्गुणोपासक चित्तवृत्तीचा निरोध साधून, पूर्ण इंद्रियनिग्रह करतात. कर्मेंद्रिये ज्ञानेंद्रियात, ज्ञानेंद्रिये अंत:करणात, अंत:करण बुद्धीत, बुद्धी अहंकारात, अहंकार जीवात्म्यात, जीवात्मा परमात्म्यात अशा सोपानपरंपरांनी निर्गुणोपासना करणारे साधक उत्तरोत्तर आपोआप ही लयरूप अरूप लालनलीला लक्षून निर्गुण, निष्क्रिय, निराकार, निरहं, निर्लिप्त परमेश्वरालाच प्राप्त करतात.

५. अव्यक्ती गोतिती चित्त क्लेश त्यास विशेष चि
देहवंतास अव्यक्ती सुखे बोध घडे चि ना

सुलभता, सुकरता आणि सुख सर्वांनाच हवे असते. दुर्लभता, दुष्करता आणि दु:ख कोणालाच नको असते. परंतु सौलभ्य, सौकर्य आणि सौख्य याविषयी अनेक कल्पना असतात. एकाला जे सुलभ ते दुसऱ्याला दुष्कर, एकाला जे सुख ते दुसऱ्याला दु:ख असेही आढळून येते. इतकेच नव्हे तर एका काळची सुलभता,

सुकरता आणि सुख अन्य भिन्न काळात तसेच राहत नाही. तीच गोष्ट स्थलाची. एका स्थलातले सौलभ्य, सौकर्य, सौख्य दुसऱ्या स्थलात तसेच अनुभवास येत नाही. परंतु परमेश्वर कोणताही काल, कोणतेही स्थल असो, कोणतीही व्यक्ती असो, सर्व काळी, सर्व स्थळी सर्वांना सुलभ, सुकर आणि सुखदाई असूनही तो कोठेही दिसत नसल्यामुळे त्याची सगुण उपासना करणेही कठीण होते. डोळ्याला अनुकूल दृश्य दिसले की सुख होते. प्रतिकूल दृश्य दिसले की दु:ख होते. अनुकूल प्रतिकूल दोन्ही बाबीत, दु:खात आणि सुखात एकच परमेश्वर पाहण्याचा प्रयत्न सहज सुकर होत नाही. चित्ताला वारंवार कष्ट द्यावे लागतात. एखाद्या वेळी एखादा कठीण पर्वत चढावा, एखाद्या वेळी एखादी दुस्तर नदी तरून जाण्याचा प्रसंग यावा, एखाद्या वेळी घोर अरण्यात श्वापदांच्या भयाने भयभीत होण्याची पाळी यावी. अशा वेळी मनुष्य कसा तरी या सर्वातून पार होऊ शकतो. परंतु येथे सगुण, साकार, सक्रिय, साहंकार सृष्टीत या सर्वांच्या पलीकडे असलेला परमेश्वर सतत प्रयत्नपूर्वक पुढे उभा करावा लागतो. ही स्थिती क्लेशकारक ठरते. ही जर सगुण, साकार, सक्रिय परमेश्वर पाहण्याची सगुण उपासनेतली अवस्था तर निर्गुण, निष्क्रिय, निराकार, निरहं, निर्लिप्त परमेश्वर पाहण्याची परिस्थिती किती क्लेशकारक ठरेल? व्यक्तोपासनाही जिथे अतिशय क्लेशकारक ठरते. तेथे अव्यक्तोपासनेत चित्त गोवणाऱ्यांना किती अधिक क्लेश होत असतील याची कल्पनाच करवत नाही. त्यांचे क्लेश क्लेश शब्दाने किंवा फार अधिक क्लेश म्हणून, अथवा कोणत्याही भाषेने प्रकट होऊ शकत नाहीत. सहाणेच्या साधनाने घासून घासून अतिशय तीक्ष्ण बनलेल्या वस्तऱ्याच्या धारेवरून चालणे, महाप्रलयाच्या महापुरातून तरून पलीकडे जाणे, विषाचे सतत सेवन करून परिपुष्ट होऊ पाहणे किती क्लेशकारक! अशा उपमांनीही ही क्लेशकारकता

व्यक्त होणे शक्य नाही. याचे कारण हे की स्वत: देहवान् असून विदेही अव्यक्ताचा बोध प्राप्त करण्याची ही कल्पना आहे. पश्चिम दिशेला गमन करून पूर्वदिशेची प्राप्ती, स्वत:च्या घराला आग लावून मलयगिरीच्या शीतलतेची उत्पत्ति, किंवा पाताळात प्रवेश करून स्वर्गातली उपस्थिती ही गोष्ट कठिणातले कठीण, अशक्यप्राय आहे याविषयी कोणालाही शंका असेल काय? म्हणून भगवान् म्हणतात -

६. परी जे सगळीं कर्मे मज अर्पूनि मत्पर
अनन्य भक्ति-योगाने भजती चिंतुनी मज

सकल नदनद्यांनी अनेक जलधारांनी आपले सर्वस्व समुद्राला अर्पण करावे, आपल्या अंगसंगामध्ये रंगलेले सर्व सौरभ्यसार फुलांनी वाहणाऱ्या वायूवर वाहवून द्यावे, अरण्यातल्या फळांनी आपली सर्व मधुरता, आपले सर्व मार्दव, आपली सर्व मोहकता वनभूमीला समर्पून द्यावी, त्याप्रमाणे आपली सर्व सेवाकर्मे अत्यंत कुशलतेने, अत्यंत उत्साहाने, अतिशय नाविन्याने, परम प्रमोदाने, नितांत सुंदरतेने, माधुर्याला मधुरता देत देत, मार्दवालाही मृदु बनवीत बनवीत, शालीनतेच्या शालीनतेने, अतिशय दक्षतेने, निष्कामतेच्या सौजन्याने, प्राणाच्या प्रियतेने, त्या परात्पर प्रभूच्या पादपद्मी वाहून भक्तजन प्रभूशी एकरूप होऊन राहतात. त्यांना दुसरे काहीच सुचत नाही. त्यांच्या ध्यानात, मनात, जनात कोठेही केव्हाही काहीही दिसत नाही. ते प्रभु-भजनाशिवाय अन्य काहीच ऐकत नाहीत, अन्य काहीच जाणत नाहीत. अशी त्यांची एखाद्या मनोहर मूर्तीच्या ध्यानाप्रमाणे तटस्थ चैतन्यमय अवस्था होते.

७. माझ्यांत रोविती चित्त त्यास शीघ्र चि मी स्वयं

## संसारसागरांतूनि काढितो मृत्यु मारुनी

मूर्तीच्याप्रमाणे तटस्थ अवस्था म्हणजे तर ती जड अवस्था आली ना? या शंकेला येथे वाव मिळेलसे भासेल. पण चैतन्यमय अवस्था म्हटल्याने ती शंका सूर्यकिरण पडल्यावर जसे दवबिंदू विरून जातात त्याप्रमाणे सहजच निर्मूल ठरते. शिवाय ही मूर्ती चैतन्याचा चैतन्य जो महाप्रभू त्याच्या ठिकाणी मग्न झाली आहे त्यामुळे येथे जडतेचे लेशमात्रही कारण नाही.

वास्तविक मन हे कोठेच स्थिर होत नाही. पण केवढे भाग्य की भक्तांना प्रभूच्या ठिकाणी लीन होण्याची शक्ती लाभते. त्यामुळे राजराजेश्वराला ज्याप्रमाणे दारिद्र्यदैन्याचे भय नाही, बृहस्पतितुल्य विद्वानाला ज्याप्रमाणे निरक्षरतेचे भय नाही किंवा महान् बलभीमाला निर्बलतेचे भय नाही. त्याप्रमाणे सर्वात मोठ्यात मोठे भय जे मृत्यूचे भय ते भक्ताच्या ठिकाणी प्रभुकृपेने मुळीच उरत नाही. कारण परमेश्वर भक्तासाठी मृत्यूचाच मृत्यू ठरतो. पण सर्वात मोठ्या मृत्युभयाहूनही मोठे भय जो संसारसमुद्र, ज्यात अनेक विकारांचे, अनेक महामोहाचे प्रतिक्षणी भयानक तांडवनृत्य चालू असते, ज्यातून कोणताही प्राणी सुटला नाही, अनेक प्रकारांनी प्रचंड तिमिंगलतुल्य महामत्स्यांनी तोंड फाडून ग्रस्त करणारी रूपे धारण केलेली आहेत, ज्यात तरणारा आणि ज्यातून तारणारा आजपर्यंत कोणीच झाला नाही. कामक्रोधमदमत्सराच्या खाऱ्या पाण्यानेच जो सतत उसळत राहिला आहे, त्याचेही भय भक्तांना राहात नाही. कारण साक्षात् परात्पर प्रभूच्या ठिकाणी भक्तांची भक्ती जडून राहिलेली असते; तेथे पाण्यात तरण्यासाठी तारक ठरलेल्या त्या सांगडी, ते तराफे, त्या मोठ्या मोठ्या नौका, त्यांची जरूरच राहत नाही. सर्व साधनांचे साधन, सर्व साध्याचे साध्य तो जो भक्तांचा कैवारी प्रभू तो भक्तांना तत्क्षणी या संसारसागराच्या परपार नेण्याला तयार होतो. मग त्या

संसारसमुद्राच्या पलीकडच्या प्रभुप्रभावाच्या प्रदेशात ते अनेक अमंगळवाणे जन्म कोठे गेले? ते मनाचे नेहमीचे अतिशय त्रासदायक चांचल्य कोठे आहे? ते विकराळ विकारांच्या वास्तव्याचे ठिकाण कोठे आहे? त्याचा मागमूसही राहिला नाही. हे कसे काय झाले? हे दिव्य स्वप्न खरे का? हे तर महदाश्चर्य महादाश्चर्य सिद्ध झाले असा भक्तांना अनुभव येतो. म्हणून भगवान् खास अर्जुनाला पण सर्वांनाच ध्यानात ठेवण्याजोगी गोष्ट आवर्जून सांगतात -

८. मन माझ्यांत तू ठेव बुद्धी माझ्यांत राख तू
म्हणजे मग नि:शंक मी चि होशील तू स्वये

अर्जुना काळ्याभोर रात्री आकाशाच्या अंतरंगात तेलवातीशिवायचे असंख्य रत्नदीप तेवत राहतात. तेच त्यांचे योग्य स्थान नाही का? अर्जुना! लोभाने कोणी कितीही संपत्ती जमा केली तरी सोने, चांदी, पाच, नीळ, वैदूर्य, लाल इत्यादी संपत्ती वैपुल्याने पृथ्वीच्या पोटातच रहावी हे स्वाभाविक नव्हे काय? नानाविध फुलांचे गुच्छ, हार, गजरे घालून नटणारे कोणी कितीही नटोत, पण अतिशय कोमल आणि सुंदर, मोहक व सुवासिक फुलांचे डूल वनोपवनातल्या पानांच्या कानातच डोलावे हे योग्य नव्हे काय? अरे! कोणी कितीही ग्रंथसंपत्ती आपल्या जवळ बाळगली तरी खरोखरच सर्व ग्रंथ आणि सकल ग्रंथी छेदणारे ज्ञानाचे स्थान परमपवित्र गुरूच्या शुश्रूषतेचतच समाविष्ट व्हावे हे क्रमप्राप्त नाही काय? तीच स्थिती मन आणि बुद्धीच्या बाबतीत विचारणीय ठरते. मननाचा आणि बोधाचा, प्रज्ञेचा आणि प्रतिभेचा, प्रेमाचा आणि सेवेचा ठेवा का भलत्याच कोणत्या तरी ठिकाणी ठेवता येईल? भ्रमरांना भ्रमण करीत करीत गुणगुणत गुणगुणत रमण्याला कलमकोशच योग्य. कोकिळांना आम्रमंजरीचाच खरा आसरा. वसंताच्या क्रीडेचे स्थान वनोपवनातच. परस्पर सौहार्द्र, सर्वांशी प्रेमळ आणि

परोपकारी वागणूक, सर्वांशी सहकार्य हे सज्जनांच्या ठिकाणीच असावयाचे हे काय सांगावयास पाहिजे? अर्जुना, तू हे सर्व जाणतोसच. आचारवान् आणि नीतीमान्, विचारवान् आणि भक्तिमान् मोठे आणि जबाबदार असा मुलगा परगावी जात असताना आईला सांगितल्यावाचून राहवत नाही की बाबा! तू कर्तव्य म्हणून परगावी जातोस खरा पण तेथे भलत्या संगतीत राहू नकोस. त्याप्रमाणे मला राहवत नाही म्हणून मी सांगतो अरे अर्जुना! ध्रुवाने उत्तर दिशेला, उषेने सर्व दिशेला, संध्येने पश्चिम दिशेला, लक्ष्मीने विष्णूच्या पायापाशी, गंगेने शंकराच्या जटाजूटात रहावे हेच योग्य ठरते. त्याप्रमाणे तुझे मन आणि बुद्धी तू माझ्याच ठिकाणी ठेव. तेच योग्य आहे. तुझे सर्व मनन, तुझी सर्व मननशक्ती, तुझा सर्व बोध, तुझी सर्व बुद्धीशक्ती तू माझ्या ठिकाणीच ठेव. ही तुझी ठेव पटीपटीनेच वाढेल. तुझ्या ठेवीला चोरीचे भय नाही. येथे चोरीच चोरली गेली आहे. सकल विश्वाच्या विश्वासाचा ठेवा तूच होशील. तू मीच होशील. माझे सर्व काही तुझेच होईल. ममतेची ममता अर्जुना! माझ्या ठिकाणी प्राप्त होईल! अर्जुना! भ्रमरांना कधी कमलपणा प्राप्त झाला आहे काय? कधी कोणी ऐकले आहे काय की समुद्रात पोहणाऱ्याने समुद्रच आपल्या ठिकाणी समाविष्ट केला? अर्जुना! कोणाच्या कधी अनुभवास आले आहे काय की निद्राच निद्रा घेण्याला बिछान्याला विनवू लागली? या सर्व चमत्काराच्या गोष्टी आहेत. न घडलेल्या न घडणाऱ्या गोष्टी आहेत. त्या न घडोत. पण येथे मात्र हा चमत्कार तू पहा. तू मन आणि बुद्धी माझ्या ठिकाणी ठेवलीस की तू एकदम मीच होशील. येथे शंकेला मुळीच स्थान नाही. अरे शंका कोठपर्यंत? जोपर्यंत अनुभव आला नाही तोपर्यंत. रात्र कोठपर्यंत? जोपर्यंत सूर्योदय झाला नाही तोपर्यंत वाट चुकणे कोठपर्यंत? जोपर्यंत रस्ता दिसला नाही तोपर्यंत. भूक कोठपर्यंत? जोपर्यंत जेवण पूर्ण झाले नाही तोपर्यंत, चालणे कोठपर्यंत? जोपर्यंत घर आले नाही तोपर्यंत.

परकेपणा कोठपर्यंत? जोपर्यंत मैत्री दृढ झाली नाही तोपर्यंत. म्हणून अर्जुना! तुला पुन्हा सांगतो की, प्रेमाला पुनरावृत्तीचे भय असते. म्हणून पुन:पुन्हा सांगतो की, आपले सारसर्वस्व जे मन, जी बुद्धी ती तू माझ्या ठिकाणी ठेव आणि मीच होऊन जा. माझे तुझ्यावर एवढे प्रेम आहे की, मला तू केव्हा मीच होशील असे मला झाले आहे - हे सर्व सांगूनही भगवान भक्तांची, अर्जुनाची अडचण लक्षात घेऊन म्हणतात -

९. जाईल जड माझ्यात चित्तास करणे स्थिर
तरी अभ्यासयोगाने इच्छूनी मन मेळवी

कोणतीही गोष्ट कोणत्याही काळी कोठेही त्या परात्पर प्रभूला अशक्य वाटत नसल्यामुळे, मनबुद्धी समर्पणाने एकदम प्रभूशी सारूप्य साधत असल्यामुळे आणि संसारसागरातून तरून जाणे याचा स्पष्टार्थ प्रभूशी सारूप्य साधणे हाच असल्यामुळे भगवंतांनी मनबुद्धीसमर्पणाची गोष्ट सांगितली हे स्पष्ट आहे. परंतु भक्ताने आपली अडचण न मांडताच स्वत:च अडचणीत असलेल्या भक्तांची भूमिका घेऊन भगवंतांनी सांगण्यास सुरुवात केली.

मनबुद्धी म्हणजेच चित्त. ते कोठेही स्थिर होत नाही. कोटी कोटी कल्पनाकल्लोळांनी कल्लोळून ते चित्त कोठे जाते त्याचा ठावठिकाणा कोणालाही कधीही लागत नाही. किती ठिकाणी भ्रमण करून ते पुन्हा सतत भ्रमणाला लागत असते याची स्वत: चित्ताला काहीच कल्पना येत नाही. आपलेच आपणाला दर्शन कसे होणार? दृष्टीला सर्व सृष्टी दिसते पण दृष्टी दृष्टीला पाहू शकत नाही. चित्त चित्ताला पाहील तर काय पाहिजे? ते तसे पाहू शकत नाही म्हणून ते स्थिर होत नाही. त्याची अस्थिरता म्हणजेच जणू त्याचे मूलस्वरूप. एथपर्यंत त्याच्या संबंधीची कल्पना कल्पिली जाते. अशा स्थितीत त्याचे स्वरूप

कसे पालटणार? अग्नीचे स्वरूप बदलून अग्नी कधी पाणी होईल काय? पाण्याचे स्वरूप बदलून पाणी कधी अग्नी होईल काय? प्राण्यांचे वृक्ष आणि वृक्षांचे पाणी, घाणीचा सुगंध आणि सुगंधाची घाण, आकाशाची पृथ्वी आणि पृथ्वीचे आकाश, वायूचा पर्वत आणि पर्वताचा वायू कसा होईल? चित्ताचे मूळस्वरूपच जर अस्थिरता असेल तर ते स्थिर कसे होईल? असे केवळ निरुपायाचे निखळ नैराश्यच मग पदरात पडेल.

पण चित्त म्हणजे केवळ अस्थिरता अशी स्थिती नसून ते चैतन्याचे एक स्वरूप असल्यामुळे त्याच्या आंशिक चैतन्यस्वरूपामुळे ते पूर्ण चैतन्यस्वरूप परमात्म्याच्या ठिकाणी स्थिर होऊ शकेल यात शंका उरत नाही. म्हणूनच भगवान म्हणतात चित्त परमेश्वराच्या ठिकाणी मिळून जाणे ही गोष्ट अशक्य नसून ती फक्त जड जाण्याजोगी गोष्ट आहे. ही अडचण दूर झाली पाहिजे. ही अडचण म्हणजे मार्गातला आड आलेला प्रचंड हिमालय पर्वत नव्हे. अथवा ही समुद्र तरून जाण्याची गोष्ट नाही किंवा ही गोष्ट म्हणजे आकाशात भराऱ्या मारणे नव्हे. ही प्रयत्न करून दूर करण्याजोगी गोष्ट आहे. सार्वकालिक सार्वत्रिक सार्वभौम सिद्धांत आहे की बहुधा आपल्या इच्छेप्रमाणे क्वचितच केव्हा एखादी गोष्ट घडून येते. आपल्या इच्छेप्रमाणे न घडणाऱ्या गोष्टीच अधिक असे असले तरी इच्छा आपली गोष्ट सोडून देत नाही. इच्छा उलट तीव्र, तीव्रतर, तीव्रतम होता जाते आणि अशा तीव्र स्वरूपामुळे ती इच्छा मनुष्याचा प्रयत्नांशी योग घडवून आणते. तो योग म्हणजेच अभ्यास-योग तीव्र इच्छेने अभ्यास-योगाची प्राप्ती आणि अभ्यास-योगाने पुन्हा तीव्र इच्छा अशी परस्परसहायाची अवस्था निर्माण झाली म्हणजे साध्य सिद्ध होण्याला अडचण पडत नाही. चित्त परमेश्वरस्वरूप होण्याला हाच तीव्र इच्छेचा अभ्यास-योग भगवान सांगतात. पण हा तीव्र इच्छेचा अभ्यास-योग साध्य न झाल्यास कसे करू? ही ही चिंता निवारण व्हावी म्हणून

परमकारुणिक भगवान् सांगतात.

१०. अभ्यास हि नव्हे साध्य तरी मत्सर्म आचरी
मिळले तुज ती सिद्धी मत्कर्म ही करूनिया

अर्जुना! प्रयत्नच न करणाऱ्याला उपाय सांगण्याचे काहीच प्रयोजन नसल्यामुळे पराकाष्ठेचा प्रयत्न करूनही तो सिद्ध झाला नाही तर त्याला इलाज नाही असे नाही; हे तू लक्षात घे. अरे! एक मार्ग मोकळा नसेल, त्यावर झंझातानामुळे वृक्ष उन्मळून पडले असतील तर दुसऱ्या सुरक्षित मार्गाने जाता येते. बाजारात अमुक एक धान्य मिळाले नाही तर दुसरे धान्य घेता येते. प्रवासाच्या वेळी आपल्या घराचा कोणी येऊ शकला नाही तर मित्राला घेऊन प्रवासाला जाता येते त्याप्रमाणे पराकाष्ठेचा प्रयत्न करूनही जर अभ्यास सुद्धा साध्य होईनासा झाला, साध्याला साध्य करण्याला असमर्थ ठरला तर माझ्यासाठी अनेक सेवेची क्षेत्रे आहेतच. त्या मार्गाने तुला सुलभतेने सगळे काही प्राप्त करून घेता येईल. अर्जुना! सेवासाधनेच्या सुखात एवढे मोठे सामर्थ्य आहे की सिद्धी प्राप्त होऊ शकेल की नाही या कल्पनेची लेशमात्र छायाही तेथे उमटू शकत नाही. अरे! सिद्धी कोठे जाईल, ती आपण होऊन सेवकाकडे येईल. ती सेवकाची सेविका बनेल पण मत्कर्म म्हणजे माझ्यासाठी कोणतेच कर्म करण्याची आवश्यकता नाही. समुद्राला पाणी पुरविण्याची आवश्यकता असेल काय? अग्नीला आणखी कोणत्या अग्नीने ऊब आणावी? पाण्याला कोणत्या पाण्याने पाणी पाजावे? वाऱ्याला वारा घालावा लागेल काय? सुगंधाला सुगंधाची काही आवश्यकता आहे असे मानता येईल काय? म्हणून माझ्यासाठी कर्म करण्याची भाषा ही केवळ भाषाच आहे. तिचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. मत्कर्म म्हणजे सत्कर्म होय. समाजात जिकडे तिकडे फूट फूट पडलेली असते. द्वेष मत्सर

वाढलेला असतो. त्यासाठी सगळ्यांची परस्पर मैत्री जोडण्याचे कर्म ते मत्कर्म होय. जिकडे तिकडे समाजात अहंममत्वाची स्पर्धा लागलेली असते. ती परस्परसहकार्यात परिणत करणे म्हणजे मत्कर्म होय. समाजात सुखी आणि दु:खी असा विभाग पडलेला असतो. तेव्हा दु:खी लोक सुखी करण्याचे आणि सुखी लोक परोपकारी करण्याचे कर्म ते मत्कर्म होय. समाजात जिकडे तिकडे अशांती माजलेली असते. ती दूर करून शांतिस्थापनेचे कर्म करणे म्हणजे मत्कर्म होय. समाजात अनेक कारणांनी असंतोष धुमसत असतो. तो दूर करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मत्कर्म होय. समाजात स्वैरतेचा स्वैरसंचार दिसून येतो. तेव्हा सर्वत्र संयमाची प्रेरणा देण्याचे कर्म ते मत्कर्म होय. नेहमी समाजात अनिश्चिततेचे वातावरण पसरलेले असते. तेव्हा समाजात निश्चिततेचा निर्धार निर्माण करणे तेच मत्कर्म होय. फार काय सांगावे समाजात माझ्या भक्तीप्रेमाचा अभाव दिसून येतो तो दूर करून तेथे खरा जिव्हाळा सतत वाढवीत राहणे हे मत्कर्म होय. हे मत्कर्म ही स्वयमेव सिद्धी आहे. ती तुला प्राप्त होईल. पण तीही सुलभ सुकर गोष्ट नाही आणखीही तुला सुलभ साधन सांगतो.

११. न घडे हे असे कर्म योग माझ्यात साधुनी
तरी सर्व चि कर्मांचे प्रयत्ने फळ सोड तूर

मत्कर्मही सुलभ न होण्याचे कारण हे की, समाजसेवाकार्यात अहंममतेचे विलीनीकरण होणे हेही सुलभ नाही. सर्व भूतमात्रात नारायण पाहणे हेही सुलभ नाही. केरळकोकणातले कुशल लोक नारळाच्या उंच-उंच सरळ झाडावर सरसर चढून नारळ तोडून क्षणार्धात खाली उतरतात. पण ते सर्वांना कसे शक्य व्हावे? महापुरात पोहून परतीराला जाणारे पटाईत पोहणारे पुष्कळांनी जरी पाहिले असले तरी त्यांना पोहताना पाहूनच भीती वाटते. परमेश्वराशी योग साधून सेवाकर्म

करीत असताना त्याचे केव्हा विस्मरण झाले हे कळतही नाही. जप करण्यासाठी अतिशय पवित्र अशा प्रभातकाली पवित्र शांत एकांत स्थानी जरी बसलो तरी जपमाळेचे मणी गणता-गणता मन कोठल्या कोठ निघून जाते आणि ईश्वराशी योग साधणे सुटून जाते हे कळतही नाही अशा स्थितीत काय करावयाचे हा यक्षप्रश्न येथे उपस्थित झाल्यावर भगवान मूळचे अभ्यासाचे अर्थात प्रयत्नाचे सूत्र न सोडता अर्जुनाला सांगतात - अर्जुना ! तू सर्व कर्मांचे फळ सोडून दे. सूर्य-चंद्रतारे आपला प्रकाश आपणाजवळ न ठेवता सतत सगळीकडे टाकीत जातात. मेघ पर्जन्यवृष्टी सृष्टीसाठी करीत असतात. स्वत:जवळ पाणी ठेवीत नाहीत. वृक्षवेलीही आपली फळे भूमीवर टाकून मोकळे होतात. त्याप्रमाणे अर्जुना! आपल्या लहान मोठ्या सर्वच कर्मांचे फळ तू सोडून दे. म्हणजे माझ्या ठिकाणी योग साधून कर्म करण्याची कठिणता उरणार नाही. लहान मुलाला अमुक अन्न पचत नाही तर आई दुसरे रोचक आणि पाचक अन्न करून देते. ती त्या मायाळू माउलीची ममतामय योजना येथे दिसून येते. सगुण उपासकांना परमेश्वराशी योग साधून कर्म करणे शक्य झाले नाही तर, म्हणजे परमेश्वर निर्गुण वाटू लागला तर आपण स्वत: मागे सरून भगवान् भक्तांना सर्वात सोपी साधना सांगत आहेत. ही येथली विशेष गोष्ट आहे. कर्मातली ममता सुटली की ते कर्म आपोआप परमेश्वरार्पण होणारच आणि अशाप्रकारे परमेश्वराचा प्रत्यक्ष योग सोडूनही अप्रत्यक्षपणे तो साधेल ही मोठी कुशल कर्मयोजना येथे दृग्गोचर होत आहे. मुलाने खेळाच्या नादात आईला सोडले तरी आई त्याला कधीच सोडीत नाही. तिचे त्याच्यावर सतत लक्ष असते. अशाप्रकारे ती केवळ माऊली नव्हे तर साक्षात गुरुमाऊली बनून आपल्या मुलाला अभ्यासाची, ज्ञानाची, तन्मयतेची, फलत्यागाची, तत्काल शांतीप्राप्तीची सर्व सोय उपलब्ध करून देते.